I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 164-166
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# भारतातील बेरोजगारी मुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या: एक अभ्यास

प्रा. उषा य. माने

श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा ता. परळी जि. बीड

Corresponding Author : maneusha600@gmail.com

Communicated : 25.03.2022 | Revision : 29.03.2022 Accepted : 02.04.2022 | Published : 02.05.2022

**प्रस्तावना :**

कोणत्याही समाजात अस्थिरता निर्माण करणारी एक गंभीर स्वरुपाची समस्या म्हणजे बेकारी होय, यालाच बेरोजगारी म्हणतात. मानवी गरजांच्या पूर्ततेसाठी पैसा व पैसा मिळविण्यासाठी काम आवश्यक असते मात्र काम मागणारे किंवा काम करण्यास तयारी दर्शविणारे मोठ्या प्रमाणात असूनही त्यांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे काम मिळत नसेल तर तेथे बेकारी किंवा बेरोजगारी निर्माण होते. भारतात अशा प्रकारच्या बेकारीने उग्र स्वरूप धारण केले आहे. त्यामुळे देशात हा प्रश्न गंभीर होऊन बसला आहे.

**उद्देश**

सदर शोध निबंध पुढील उद्देश डोळ्यासमोर ठेवून करण्यात आले आहे.

- भारतातील बेरोजगारीचा अभ्यास करणे.
- भारतातील बेरोजगारीची सद्यस्थिती तपासणे.
- भारतातील बेरोजगारीची कारणे शोधणे.
- बेरोजगारी वर उपाय सुचवणे.

**अभ्यास पद्धती**

सदर शोध निबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतलेला आहे. दुय्यम माहिती पुस्तके, वेबसाईट, वर्तमानपत्र, इत्यादीचा आधार घेतलेला आहे. वरील उद्देश डोळ्यासमोर ठेवून सामुग्री संकलन केले आहे.

**बेरोजगारीची संकल्पना:**

बेरोजगारीच्या प्रश्नांचा विचार करता देशातील केवळ कार्यकारी लोकसंख्येचा विचार करावा लागतो. बालक किंवा लहान मुले व वृद्ध व्यक्तीं बेरोजगारीत समावेश होत नाही. कारण बालकामध्ये काम करण्याची क्षमता आलेली नसते, शिक्षणाचे वय असते. याउलट वृद्ध व्यक्तीमध्ये काम करण्याची क्षमता शिल्लक राहिलेली नसते. तसेच संन्यासी, अपंग, वेडे, आजारी आणि श्रीमंत व काम करण्यास इच्छुक नसलेल्या व्यक्ती यांना कार्यकारी लोकसंख्येतून वगळून, काम करण्यास इच्छुक व योग्य व्यक्ती १५ ते ६० वर्षे वयोगटातील असते त्यांना कार्यकारी लोकसंख्या म्हणतात.

अ) अनैच्छिक बेकारी: याला उघड बेकरी असे म्हणतात. येथे काम करताना पात्र व काम करण्याची तयारी असताना त्याला काम प्राप्त होत नाही. किंवा मनस्थिती नसतानाही असेल ते काम करावे लागते. तेही विनामोबदला किंवा कमी मोबदला. उदाहरणार्थ विनाअनुदानित वर काम करणारे शिक्षक, तसेच सेट–नेट पीएच.डी असूनही तासिका तत्त्वावर काम करणे.

आ) ऐच्छिक बेकारी: व्यक्तीला त्याच्या पात्रतेनुसार प्रचलित वेतन दरानुसार काम मिळत असूनही जर तो व्यक्ती ते काम स्वीकारण्यास तयार नसेल व बेरोजगार राहणे पसंत करीत असेल तर, या स्थितीला ऐच्छिक बेकारी असे म्हणतात.

इ) अर्धबेकारी न्यून: जेव्हा व्यक्तीला तिच्या क्षमतेपेक्षा कमी क्षमतेच्या रोजंदारीवर नेमले जाते तेव्हा ती अर्ध रोजगारी किंवा अर्धबेकारी समजली जाते.

ई) व्यक्तीकडे पात्रता, कौशल्य, इच्छाशक्ती असूनही कोणत्याच ठिकाणी काम प्राप्त होत नाही याला पूर्ण बेरोजगारी म्हणतात.

बेरोजगारी अर्थ– बेरोजगारी म्हणजे प्रचलित वेतनावर जेंव्हा एखाद्या व्यक्तीची काम करण्याची इच्छा व क्षमता असूनही अशा व्यक्तीला काम मिळत नसेल तर त्याला बेरोजगारी असे म्हणतात.

**भारतातील बेरोजगारीची कारणे**

१) वाढती लोकसंख्या: स्वातंत्र्यानंतर अतिशय वेगाने लोकसंख्येत वाढ झाली. त्या तुलनेत रोजगाराच्या संधी कमी असल्याने बेरोजगारीत प्रचंड वाढ झाली.

२) आर्थिक विकासाचा मंद वेग: भारतातील आर्थिक विकासाचा वेग कमी राहिल्याने पुरेशा रोजगार संधी निर्माण झाल्या नाहीत त्यामुळे बेकारीचा अनुशेष वाढत राहिला.

३) हंगामी शेती: भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे पाच ते सहा महिने शेतीत रोजगार उपलब्ध होतो. हंगाम संपला की, ग्रामीण भागात लोकांना बेकार राहावे लागते.

४) लघु उद्योगाची मंद प्रगती:

शेतीवर आधारित किंवा इतर क्षेत्रात छोटे–छोटे उद्योग उभे राहणे अपेक्षित होते. परंतु लोकसंख्येच्या तुलनेत उद्योगाचा वेग मंद ठरला परिणामी बेकारी वाढली.

५) यंत्राच्या वापरात वाढ: घ* व्या शतकाच्या औद्योगिक क्रांतीचे परिणाम यंत्र निर्मितीत वाढ झाली मानवी श्रमाची जागा यंत्राने घेतली परिणामी माणसाच्या हाताला काम राहिले नाही.

६) सदोष शिक्षण पद्धती: काळानुसार प्रचलित शिक्षणात बदल होऊन व्यवसायभिमुख शिक्षण देणे अपेक्षित होते.हे आजही झाले नाही. परिणामी बेकारीत वाढ झाली.

७) व्यवसायिक शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी: व्यावसायिक शिक्षणाच्या अपुऱ्या सोयीमुळे प्रशिक्षित मनुष्यबळ मिळत नाही व अप्रशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढते आहे.

८) भांडवल निर्मितीचा कमी दर: भारतातील भांडवल निर्मितीचा दर अल्प आहे. भांडवल निर्मिती बचतीवर अवलंबून असते. लोकांचे उत्पन्न उपभोगावर खर्च होते त्यामुळे बचत कमी होऊन भांडवल निर्मिती कमी होते. परिणामी उद्योगधंद्याची निर्मिती कमी होऊन बेरोजगारी वाढते.

९) सदोष नियोजन: उपलब्ध मनुष्य बळाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेता येईल अशा कार्यक्रमांना नियोजनात प्राधान्य दिले गेले नाही. त्यासाठी रोजगारभिमुख योजना हव्यात.

१०) संघटन कौशल्याचा अभाव: 'एकला चलो रे' ही भूमिका समाजात वाढल्याने संघटन कौशल्याचा अभाव जाणवतो. परिणामी उद्योग उभे करून मालक होण्याऐवजी दुसऱ्याच्या व्यवसायात नोकर होण्याची मानसिकता वाढली परिणामी बेरोजगारी वाढली.

११) साधन संपत्तीचा अपुरा वापर: भारतात नैसर्गिक साधन संपत्तीचा भरपूर पुरवठा आहे. परंतु नैसर्गिक साधन संपत्तीचा अपुऱ्या वापरामुळे बेरोजगारी वाढते.

**बेरोजगारीची सामाजिक परिणाम पुढीलप्रमाणे**

१) बालमजुरांचा प्रश्न: बेकारीच्या काळात कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यापुरते उत्पन्न मिळणे कठीण होते. अशा परिस्थितीत जेव्हा काम उपलब्ध असते तेव्हा आपल्या लहान मुलांना देखील कामावर पाठवतात. आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यामुळे बालमजुरांचा प्रश्न निर्माण होतो.

२) निरक्षरतेचा प्रश्न: बेरोजगार व्यक्तीच्या कुटुंबातील लहान मुलांनादेखील काम करावे लागते. त्यामुळे शिक्षण सोडावे लागते परिणामी निरक्षरतेचा प्रश्न कायम राहतो.

३) मुलांच्या संगोपनाचा प्रश्न: बेरोजगारीमुळे कुटुंबातील स्त्री व पुरुष दोघांनाही हंगामी काम मिळाल्यास कामावर जावे लागते त्यामुळे मुलांच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण होतो.

४) समाजातील नैतिक मूल्यांचा ऱ्हास: बेरोजगार व्यक्तीला उदरनिर्वाह चालविण्यासाठी लागणारे उत्पन्न जेंव्हा नैतिक मार्गाने मिळत नाही, त्यावेळी बेरोजगार व्यक्ती अनैतिक मार्ग चोरी, दरोडेखोरी,,खून, लूटमार, प्रसंगी वेश्याव्यवसाय अवलंबतात.

५) व्यसन: बेरोजगारीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा ताणतणाव कमी करण्यासाठी बेरोजगार व्यक्ती दारू, गांजा, अफू, ड्रग्ज, विडी, तंबाखू, अशा व्यसनांच्या आहारी जातात.

६) गुन्हेगारीत वाढ: नैतिक मार्गाने अनेक वेळा प्रयत्न करूनही जर रोजगार मिळत नसेल तर व्यक्ती आपला आत्मविश्वास, स्वयंप्रेरणा व जिद्द गमावून बसतो. नंतर अपरिहार्यपणे उदरनिर्वाह चालविण्यासाठी बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करून उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करत असतो. त्यातून चोरी, दरोडेखोरी, फसवणूक, प्रसंगी खून करतात. त्यामुळे समाजात अत्याचाराचे प्रमाण वाढून गुन्हेगारी वाढत जाते.

७) मानसिक व सांस्कृतिक विकासाचा प्रश्न: बेरोजगारीमुळे आवश्यक गरजा भागविणे शक्य होत नाही तेथे मानसिक व सांस्कृतिक विकासाचा विचार अशक्य आहे परिणामी मानसिकस्थिती खालावून संस्कृतीचाही ऱ्हास होतो.

८) बेरोजगारीमुळे असंतोष: एकीकडे श्रीमंती व दुसरीकडे प्रचंड गरीबी याचा असंतोष निर्माण होऊन दंगे, जाळपोळ, लूटमार प्रकार घडतात व समाजात अशांतता निर्माण होते.

**भारतातील बेकारीची सद्यस्थिती**

कोरोना काळात लॉकडाउनमुळे बेरोजगारीचा दर २७.११ टक्के झाला होता. सेंटर फॉर मॉनिटरीग इंडियन इकॉनॉमी नेही आकडेवारी मे २०२० मध्ये प्रकाशित केली होती.

डिसेंबर २०२१ मध्ये मागील चार महिन्यातील बेकारीचा दर सर्वोच्च असल्याची आकडेवारी सेंटर फॉर मॉनिटरीग इंडियन इकॉनॉमी (सी एम आय) ने आपल्या अहवालात नमूद केले आहे.यात ७ टक्के दर असल्याचे सांगण्यात आले. भारत स्वतंत्र झाला तेव्हा बेकरीचा दर २.५ पेक्षा कमी होता. हा दर स्वातंत्र्यानंतर कमी होणे अपेक्षित होते परंतु बेकारी वाढत जाऊन तो दर ७ टक्के वर गेला आहे.

**उपाय**

१) लोकसंख्येवर नियंत्रण

लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर पावले उचलणे आवश्यक आहे.

अ) सर्वधर्म व सर्व जातीसाठी एकाच मुलाची अट करावी.

ब) कुटुंबनियोजनाच्या साधनांचा प्रचार व प्रसार करावा.
क) शिक्षणात लैंगिक शिक्षणाचा समावेश करावा.
ड) लोकसंख्या वाढीचे परिणाम लोकांना कळण्यासाठी विविध कार्यक्रम राबवावेत.
२) शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करावा
१) औपचारिक शिक्षणाबरोबरच—व्यावसायिक शिक्षण मिळावे.(उदा. महाविद्यालय शिक्षणासोबत तांत्रिक शिक्षण घ्यावे.)
२) ग्रामीण भागात शालेय शिक्षणाबरोबर पशुपालन, कृषीचे शिक्षण द्यावे.
३) भारतातील उच्च शिक्षणाचे झालेले बाजारीकरणावर कडक निर्बंध घालून थांबवणे.
४) शिक्षणाच्या दर्जावर भर द्यावा.
५) शिक्षण हा मूलभूत हक्क आहे. सर्व प्रकारचे शिक्षण मोफत ठेवावे.
६) शैक्षणिक सवलती आर्थिक निकषावर दिल्या जातील याची दक्षता घ्यावी.
३) कृषी विकासावर भर

भारत हा कृषिप्रधान देश आहे येथील अर्थव्यवस्था कृषीवर चालते. तरी काही वर्षापासून शेती क्षेत्राकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे. शेतीचे उत्पन्न स्थिर ठेवायचे असेल तर त्यात वाढ अपेक्षित आहे,यासाठी पुढील योजना आखाव्यात.

१) जलसिंचनावर भर द्यावा. मोठी धरणे, कालवे बांधावीत.
२) विकासकामातील पैशांचा भ्रष्टाचार कमी करून पैसा सत्कारणी लावावा.
३) रासायनिक खतांचा पुरवठा योग्य प्रमाणात करावा.
४) रासायनिक खतांचे भाव स्थिर ठेवावेत.
५) वनसंरक्षण करणे काळाची गरज आहे.
६)पिकांना उत्पन्न खर्चाच्या आधारित सरकारने हमी भाव द्यावा.
७) स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी राबवाव्यात.
४) भांडवलनिर्मितीचादर वाढवावा:
१) सरकारने उद्योगांना स्वस्त दरात मुबलक कर्ज पुरवठा करावा.
२) उद्योगासाठी पाणी, जमीन, वीज उपलब्ध करून द्यावी.
३) देशातील लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन द्यावे.
५)सर्वक्षेत्रीय कामे सुरू करणे:
१) सरकारने कृषी, उद्योग व सेवाक्षेत्र यात गुंतवणूक वाढवावी.
२) सरकारने आपली क्रियाशील भूमिका चालू ठेवावी.
३) रोजगार निर्मितीसाठी सर्वक्षेत्रीय कामे सुरु करावी.
४) राष्ट्रीय मालमत्तेचे खाजगीकरण थांबवावे.
५) सरकारने स्वत:च्या मालकीचे उद्योग उभे करून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून द्यावा.
६) विशेष रोजगार कार्यक्रम:

सरकारने रोजगार निर्मितीसाठी अनेक कार्यक्रम सुरू केले आहेत परंतु या कार्यक्रमाचे नियोजन चांगले नाही हे कार्यक्रम भ्रष्टाचारीसाठी कारण बनले आहे.

१) कार्यक्रमातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी कठोर पावले उचलावीत.
२) हे कार्यक्रम लोकाभिमुख होण्यासाठी प्रयत्न करावेत.
३) केंद्रशासन व राज्यशासन तसेच केंद्रशासन यांच्या साह्याने बेकारी दूर करण्यासाठी जे कार्यक्रम सुरू केले आहेत त्या योजनांची अंमलबजावणी भ्रष्टाचारमुक्त केली तर त्याचा फायदा जास्तीत जास्त बेरोजगारापर्यंत पोहोचेल व बेरोजगारीचा दर निश्चित कमी होईल.

**संदर्भ :**

भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टिक्षेप प्रा. डी. आर. जगताप, डॉ. मंगला जंगले, प्रा. सौ निता वाणी, प्रा. डी. जी. पाटील. प्रशांत पब्लिकेशन जळगाव २०११
भारतीय अर्थव्यवस्था डॉ. विश्वास कदम, डॉ. गणेश गावंडे, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद २०१३
भारतीय अर्थव्यवस्था प्रा. प्र. रा. कुलकर्णी—पिंपळापुरे विद्या बुक पब्लीशर्स, औरंगाबाद १९९९
भारतीय अर्थव्यवस्था डॉ.एम. एन. साबळे, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद २००१
मानवी हक्क सामान्य अध्ययन—विभाग—ह्य नंदकुमार भारंबे, निराली प्रकाशन, पुणे २०१२
बेरोजगारी— विकिपीडिया
२७.११टक्के बेरोजगारी संबंधित क्षेत्रावरही नोकर कपातीचा दबाव—marathi.thewire.in